# अकोले तालुक्यातील कृषी सेवा केंद्रावर छापा

## अनधिकृत साठा आढळला; कृषी विभागाच्यावतीने गुन्हा दाखल

**अकोले (प्रतिनिधी)**– जिल्हा स्तरीय भरारी पथकाने अकोले तालुक्यातील मे. जय संतोषी माता कृषी सेवा केंद्र, धामणगाव पाट येथे छापा टाकून मोठ्या प्रमाणावर अनधिकृत युरिया खत साठा आढळून आणला. तपासणी दरम्यान ई-पॉस प्रणालीत फेरबदल करून शासनाची फसवणूक केल्याचे उघड झाले.

जिल्हाधिकारी डॉ पंकज आसिया, जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, विभागीय कृषी सहसंचालक दत्तात्रय गवसाने, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक राहुल बाळासाहेब ढगे, तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी आणि कृषी अधिकारी रत्नमाला शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भरारी पथकाने कृषी विक्रेत्यांची तपासणी केली. या तपासणी दरम्यान दत्तात्रय गोपीनाथ शेळके यांच्या कृषी सेवा केंद्रात साठा पुस्तक अद्ययावत नसल्याचे आढळले. तसेच खरेदी बिले नसून फक्त चलन असल्याचे त्यांनी सांगितले.

> ▸ रासायनिक खातांची कृत्रिम टंचाई करून जिल्ह्यातील शेतकरी बांधवांची अडवणूक करणाऱ्यां विरोधात कठोर कायदेशीर कारवाई करत आहोत. कृषी निविष्ठामधील गैरप्रकार दिसून आल्यास जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयास माहिती द्यावी. माहीती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल.
>
> –**सुधाकर बोराळे**, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अहिल्यानगर

तपासणी दरम्यान युरिया खताचा साठा गोदामात नसल्याचे आढळले, मात्र ई-पॉस प्रणालीत १.९३५ मे. टन (४३ गोणी) साठा शिल्लक असल्याचे दिसून आले. अधिक चौकशी केली असता ई-पॉस प्रणालीत फेरबदल करून प्रत्यक्ष विक्री न करता साठा कमी केल्याचे आढळले यातूनच शासनाची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले.

भरारी पथकाने शेजारील घराची पाहणी केली असता ३४.२४५ मे. टन (७६१ गोणी) युरिया खताचा साठा आढळून आला. हा साठा परवान्यात समाविष्ट नसलेल्या जागेत ठेवण्यात आला होता.

या कारवाईत खत नियंत्रण आदेश १९८५, अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत विविध कलमांचा भंग झाल्याचे आढळले. त्यामुळे दत्तात्रय गोपीनाथ शेळके यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.या कारवाईमुळे कृषी क्षेत्रातील अनियमितता आणि शासनाच्या फसवणुकीचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.

# चार दुकानांची तोडफोड करुन जाळपोळ

## ३७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल; वैजापूर तालुक्यातील घटना

**वैजापूर (प्रतिनिधी)**– तालुक्यातील खंडाळा येथे जमावाने चार दुकानांची तोडफोड करुन जाळपोळ केल्या प्रकरणी ३७ जणाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवनाथ लक्ष्मण नन्नावरे (वय ३५, रा- बोरसर रोड, खंडाळा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांनी १२ जून रोजी आपली विश्वकर्मा फर्निचरचे दुकान बंद केल. दुकाना पाठीमागे ते कुटुंबीयांसह राहत असलेल्या रूम मध्ये गेले. दरम्यान सायंकाळी ७.३० वाजेच्या सुमारास ३०-३५ इसम लोखंडी गज काठ्या घेऊन आले. त्यांनी त्यांच्या फर्निचर च्या दुकानाचे शटर तोडून साहित्याचे नुकसान केले. यानंतर फिर्यादी यांचे शेजारी अमोल ज्ञानेश्वर जाधव यांच्या सलूनचे शटर तोडून आतमध्ये घुसून त्यांच्या दुकानातील सर्व साहित्याची तोडफोड करून नुकसान केले. प्रसंगी फिर्यादी यांनी पाठीमागील बाजूने पळत जाऊन मागच्या दरवाजाने आपल्या पत्नी व मुलांना बाहेर घेऊन गेले. त्याचवेळी जमावाने फिर्यादी यांच्या राहत्या घरात घुसून घरातील टीव्ही फोडून घराच्या दरवाज्यावर व दुकानातील फर्निचरला ज्वलनशील पदार्थ टाकून आग लावली. तसेच शिवीगाळ करून आरडाओरडा केला. यानंतर फिर्यादी यांच्या दुकानासमोर विजय नारायण त्रिभुवन यांचे लक्ष्मी जलधारा पाण्याच्या जारच्या प्लाँटच्या दुकानाचे शटर तोडून दुकानातील पाणी फिल्टरची मशीन व पाण्याच्या टाक्या फोडून टाकल्या. तसेच गावातील सागर खरात यांच्या गाळ्यामध्ये असलेले गौरव राजेंद्र अनर्थे याचेही साई श्रद्धा नावाच्या सलूनच्या दुकानाची तोडफोड करून त्याची मोटरसायकल व सलूनची दुकान जाळून टाकली. दरम्यान घटनेनंतर फिर्यादी हे घाबरून आपल्या कुटुंबासह आंदरसुल येथे बहिणीकडे गेले होते. तर सोमवारी वैजापूर पोलीस ठाणे येथे हजर झाले असता प्रकरणात फिर्यादी यांच्यासह अन्य लोकांचे दुकान जाळून दुकानातील फर्निचर व मशीन व इतर साहित्याची नासधूस करून सहा ते सात लाखांचे नुकसान केल्याप्रकरणी वैजापूर पोलिसांत सोमवारी सायंकाळच्या सुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आमदार संजय केनेकर यांनी खंडाळा येथील चाकू हल्ला प्रकरणात सोमवारी वैजापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांची भेट घेतली. दरम्यान त्यांनी या प्रकरणात एकतर्फी कारवाई नको, या घटनेची संधी साधत ज्यांनी जाळपोळ केली अशा लोकांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली होती. दरम्यान घाबरलेल्या फिर्यादी यांना धीर देत हे कायद्याचे राज्य आहे, इथे अराजकता येऊ देणार नाही. आम्ही तुमच्या पाठीशी आहोत असे म्हणत तक्रार करण्याचे आवाहन आमदार संजय केनेकर यांच्याकडून करण्यात आले होते. दरम्यान घाबरलेल्या फिर्यादी यांनी हिंमत करत अखेर प्रकरणात सोमवारी सायंकाळी गुन्हा दाखल केला आहे.

## माजी मंत्री घोलप, बडगुजर भाजपमध्ये

**मुंबई (प्रतिनिधी)**–भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने मंगळवारी एकाच दिवशी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला जोरदार धक्के दिले. माजी मंत्री बबनराव घोलप, ठाकरे गटातून हकालपट्टी करण्यात आलेले सुधाकर बडगुजर, नाशिकचे माजी महापौर अशोक मुर्तडक, नयना घोलप यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला.

## गुंफाबाई बनकर यांचे निधन



**खैरी निमगाव (वार्ताहर)**– श्रीरामपूर तालुक्यातील खैरी निमगाव येथील गं. भा. गुंफाबाई विठ्ठल बनकर यांचे निधन झाले. येथील राजेंद्र व विजय बनकर यांच्या त्या मातोश्री तर महेश व संकेत राजेंद्र बनकर यांच्या त्या आजी होत. त्यांचा अंत्यविधी आज बुधवारी सकाळी ९ वाजता साई अमृत मिल्क (चिलिंग प्लांट) पुणतांबा रोड निमगाव खैरी येथे होईल.

# नगर शहरात १३ जुगारी रंगेहाथ पकडले

## एसपींच्या आदेशाने कारवाई; २० लाखांचा मुद्देमाल जप्त

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– शहरातील बागडपट्टी येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार एका पथकाने छापा टाकून कारवाई केली. यात १३ जणांना ताब्यात घेण्यात आले असून, तब्बल १९ लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी अंमलदार महेश सर्जेराव पाखरे यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणेश चोभे हा बागडपट्टी भागात एका पत्र्याच्या जागेत जुगार खेळण्याकरीता जागा उपलब्ध करून जुगार खेळतो व खेळवतो, अशी माहिती अधीक्षक घार्गे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी एक पथक स्थापन करून कारवाईचे आदेश दिले. या पथकाने तोफखाना पोलिसांच्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना सोबत घेऊन छापा टाकला. तेथून शरीफ अकबर पटेल (वय४०, रा. नाईकवाडी मोहल्ला, ता. नेवासा), किसन पांडुरंग अंबाडे (वय ४३, रा. चेतना कॉलनी, एमआयडीसी), आसिफ दिलावर शेख (वय ३१, रा. मध्यमेश्वर नगर, नेवासा खुर्द, ता. नेवासा), शब्बीर इब्राहीम हुसैन (वय ७१, रा. बागडपट्टी, सर्जेपुरा, मु. रा. फतेवाडी, अहमदाबाद, राज्य, गुजरात), अमित कुमार अनिल सिंग (वय ३३, रा. बागडपट्टी, सर्जेपुरा, मु.रा. साबे, ता. बारसिंग, जि. नवादा, बिहार), यशवंत पंढरीनाथ ढोणे (वय ६०, रा. लोणार गल्ली, अहिल्यानगर), सचिन काळुराम सोनवणे (वय. ३१, रा. बेगमपुरा, छत्रपती संभाजीनगर), राहुल प्रकाश भट (वय २४, रा. तांबटकर गल्ली), गणेश प्रकाश चोभे (वय ३९, रा-बाबुर्डी बेंद, ता. अहिल्यानगर), नितीन रंजीत शिंदे (वय ३३, रा. हडपसर, ता. हवेली, जि. पुणे, ह. रा. बागडपट्टी, सर्जेपुरा), रिटु कुमार नंदलाल कुमार महांतुर (वय ४३. मुळ रा. लक्ष्मीपुर, बिलावपंच, जि. सिक्रापुर, राज्य बिहार, ह.रा बागडपट्टी), राहुल गौरीशंकर सिंग (वय २७, रा. श्रीराम नगर चाळ, हनुमान नगर, नालासोपारा, मुंबई, ह.रा. बागडपट्टी), मनोज सरदारसिंग राजपुत (वय ३०, रा. घाटरोड, काँगेसवाडी, चाळीसगाव, ता. जि.जळगाव) यांना ताब्यात घेण्यात आले. १ लाख ५ हजारांची रोकड, १६ लाखांची वाहने, २ लाख ७५ हजारांचे मोबाईल असा १९.८० लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

## पान १ वरुन

### शेतीसाठी एआय धोरणाला मंजुरी

समिती, राज्यस्तरीय तांत्रिक समिती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रीटेक नाविन्यता केंद्र, कृषि विद्यापीठांतर्गत कृषि कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन व नाविन्यता केंद्र काम करतील. या धोरणाच्या माध्यमातून राज्यात कृषि क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नाविन्यतेसाठी एक अग्रगण्य केंद्र निर्माण होईल. या धोरणामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा शेतकरी-केंद्रित वापर, संशोधन, डेटा देवाण-घेवाण वाढेल, स्टार्ट-अप्सना पाठबळ मिळेल आणि यातून महाराष्ट्र डिजिटल कृषि नाविन्यतेमध्ये आघाडीवर राहील, अशी अपेक्षा आहे.

### गावागावांत हवामान केंद्रांची उभारणी

करण्यात येणार आहे. राज्यातील सर्व गावांमध्ये हवामानविषयक अचूक माहिती मिळावी यासाठी तसेच शेतकऱ्यांना हवामानाधारित कृषिविषयक सल्ला आणि मार्गदर्शन मिळावे यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा आहे. या प्रकल्पात राज्यात महसूल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. या केंद्रांद्वारे तापमान, पर्जन्यमान, सापेक्ष आर्द्रता, वाऱ्याचा वेग आणि दिशा या हवामानविषयक घटकांची माहिती प्राप्त होते. ही माहिती, मदत आणि पुनर्वसन विभाग पोकरा प्रकल्प, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर नागपूर, सर्व कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र आणि इतर संशोधन संस्था यांद्वारे वापरण्यात येते. तसेच पंतप्रधान पीक विमा योजना, हवामान आधारित फळपीक विमा योजना आदी योजनांचा लाभ देण्यासाठी या माहितीचा आधार घेतला जातो.

### पॉलिटेक्निक अभ्यासक्रमासाठी...

आणि प्रमाणपत्रे मिळण्यात होणारा उशीर लक्षात घेता, विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेपासून वंचित ठेवू नये म्हणून अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात यावी, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. या निर्णयानुसार अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत, आता २६ जून २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. यासंदर्भातील सविस्तर वेळापत्रक, प्रवेश प्रक्रियेचा तपशील आणि अर्ज सादरीकरणासाठी आवश्यक माहिती https://dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचेही मंत्री पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

### आता विद्यार्थ्यांची दिवसातून तीनवेळा हजेरी

यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश या आदेशात केला आहे. प्रत्येक शाळेमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे अनिवार्य करण्यात आले आहेत. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी चारित्र्य प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा मानसिक तणाव निर्माण होऊ नये म्हणून समुपदेशक नेमण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. विद्यार्थी अनुपस्थित असल्यास पालकांना लगेचच कळवले जाणार आहे. सर्व शाळांना दिवसातून सकाळी, दुपारी आणि सायंकाळी अशी तीनवेळा विद्यार्थ्यांची हजेरी घेतली जाणार आहे. यंदापासून सर्व शाळांमध्ये त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

### राज्यभर गाजलेल्या २००६ टँकर...

सरकारची फसवणूक केल्याप्रकरणी नगरच्या कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी दाखल गुन्ह्यात आता नगरच्या दिवाणी न्यायालयात सुनावणी सुरू झाली आहे.

नगर पंचायतीच्या कार्यक्षेत्रात (नगर तालुक्यात) १ एप्रिल २००६ ते २१ मार्च २००७ या पाणी टंचाईच्या कालावधीत सरकारी पाण्याच्या टँकरच्या डिजेल टाकीच्या क्षमतेपेक्षा अधिक डिजेलची विक्री दाखवून शासकीय कर्मचारी, सरकारी टँकर चालक व नेमण्यात आलेल्या खासगी पेट्रोल पंपाच्या व्यवसथापक यांनी काढून सरकारची १ कोटी २८ लाख रुपयांची आर्थिक फसवूणक केल्याचा गुन्हा जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाचे तत्कालीन प्रभारी कार्यकारी अभियंता पांडूरंग रामकिसन दरेवार यांनी दाखल केला होता. दरम्यान, हा गुन्हा दाखल होण्यापूर्वी जिल्हा परिषद पातळीवर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पातळीवर चौकशी समिती नेमून या घोटाळ्याची चौकशी होवून त्यानंतर नाशिकच्या पथकाने स्वतंत्रपणे चौकशी केल्यानंतर तत्कालीन ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता दरेवार यांना कोतवाली पोलिसात गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानूसार दाखल गुन्ह्यावर आता नगरचे दिवाणी न्यायाधिश एस. आर. शिंदे यांच्या न्यायालयात केस नंबर ३६९/१२ वर सुनावणी सुरू झाली आहे.

साधारणपणे १७ ते १८ वर्षापूर्वी हा टँकर घोटाळा उघडकीस आला होता. त्यावेळी जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राजक्ता लवांगरे होत्या. तर ग्रामीण पाणी पुरवठा विभागात अंबऋषी रोडे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होते. २००६ ते २००७ या काळात जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई निर्माण होती. त्या काळात सरकारी पाण्याच्या टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात आला होता. या पाणी पुरवठ्यात पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, टंचाई विभागाचे लिपिक आणि शासकीय टॅकर चालक आणि नेमण्यात आलेल्या पेट्रोल पंपचालक यांनी सरकारी पाण्याच्या टँकरच्या खेपा जादा दाखवून कोट्यावधी रुपयांची बिल काढली होती.

त्यावेळी एकट्या नगर तालुक्यात १ कोटी १८ लाख रुपयांची तर पाथर्डी पंचायत समितीमध्ये २८ लाखांची जादाची बिले निघाल्याचे प्रथदर्शनी चौकशीत समोर आले होते. त्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात केलेल्या तपासणीत सर्वच पंचायत समितीमध्ये तत्कालीन अधिकारी व कर्मचारी यांनी जादा बिल काढल्याचे आढळून आले होते. यामुळे २००७ मध्ये जिल्ह्यातील १०४ गटविकाधिकारी, पंचायत समितीच्या टंचाई विभागातील कर्मचारी आणि शासकीय टँकर चालक यांच्या विरोधात सरकार पातळीवर १ ते ४ प्रपत्र नूसार दोषारोप पत्र दाखल करण्यात येवून आधी विभागीय आयुक्त स्तरावर चौकशी करण्यात आली. यातून जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना क्लिनचिट देण्यात आली होती. तर काही तालुक्यात काढण्यात आलेली जादाची इंधनाचे बिल भरून घेण्यात आलेली आहेत.

मात्र, नगर पंचायत समितीमधील घोटाळा हा १ कोटी १८ लाखांचा असल्याने या प्रकरणी नगरच्या पोलिसात गुन्हा दाखल होता. या दाखल गुन्ह्यात १८ वर्षानंतर दिवाणी न्यायाधीश न्यायालयात सुनावणी सुरू झाली आहे. मंगळवारी या प्रकरणातील फिर्यादी व त्यावेळी साक्षीदार करण्यात आलेले दोघांची साक्ष ठेवण्यात आली होती. या साक्षीला तिघेही गैरहजर राहिल्याने आता न्यायालयाने पुढील सुनावणी ३० जूनला ठेवली आहे.

**नगर गाजले होते राज्यात**

२००७ मध्ये उघडकीस आलेल्या हा नगर जिल्ह्यातील हा टँकर घोटाळा राज्यात गाजला होता. विधानसभेत याबाबत तत्कालीन सरकारकडून खुलास करण्यात आले होता. त्यानंतर गेली अनेक वर्षे हा घोटाळा चौकशीच्या फेऱ्यात अडकाला होता. हे प्रकरण सुरूवातील शोधून काढणारे जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभगतील अधिकारी- कर्मचारी हे सेवानिवृत्त झालेले आहेत. या घोटाळ्यामुळे नगर जिल्हा परिषदेत त्यावेळी चांगलीच चर्चेत आली होती.

#### हे आहेत आरोपी

- गजाबा शिवराम शेटे, अली अब्दूल सय्यद, बुडद्दीन कादर शेख, दिवानजी लक्ष्मण चांदणे, सुखदेव कान्हू लाळगे, बाळू हिराजी शेखरे, अशोक नाथू भोसले, गोकुळचंद रभाजी नवले, कादर गुलाब शेख, कचरू भिमाजी शेकडे, बबन बन्सी जाधव, मच्छिंद्र मायांजी कराळे आणि मुरलीधर कारभारी बटुळे (सर्व शासकीय वाहनावरील टँकर चालक) अशा २५ आरोपींचा यात आरोपीत समावेश आहे.

#### असे आहेत आरोप

- विभागाकडून नगरच्या संबंधीत पेट्रोल पंपचालक यांना पुरवठा झालेला एकूण डिजेलचा साठा, त्याकाळात पंपावर असणारा डिझेल साठात यात असणाऱ्या तफावतीवरून शासकीय सेवक, टँकर चालक व पंप चाकल मॅनेजर यांनी जादाची बिले काढून सरकारच्या पैशाचा अपहार केला. तसेच खोटे रेकॉर्ड तयार केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**मुख्य अधिकाऱ्यांना आरोपी करण्याची मागणी**

दरम्यान, या प्रकरणात जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लेखी आदेशानूसार टँकर इंधनाचे बिल काढण्यात आलेले आहेत. यामुळे जर घोटाळा झाला असेल तर जिल्हा परिषदेच्या तत्कालीन मुख्य अधिकारी, पाणी पुरवठा विभागाचे ततत्कालीन अधिकारी यांना देखील आरोपी करण्यात यावे, अशी मागणी या प्रकरणातील आरोपी असणाऱ्या एका अधिकाऱ्यांने नगरच्या पोलिसांकडे केली असल्याची माहिती न्यायालयीन सुत्रांकडून देण्यात आली.

**या घोटाळ्यानंतर टँकरबाबत दक्षता**

राज्यात गाजलेल्या टँकर घोटाळ्यामुळे राज्य सरकारने सरकारी पाण्याच्या खेपा, त्यात टाकण्यात येणारे इंधन, होणारा पाणी पुरवठा याबाबत वेळोवेळी आदेश काढत त्यात सुधारणा केलेल्या आहेत. नगरचा टँकर घोटाळा उघड नसता झाला तर सरकारी पाण्याच्या टँकरबाबत सरकारने जागृतता दाखवली नसती, असे एका अधिकाऱ्यांने सांगितले. यामुळे खऱ्याअथाने पाण्याच्या टँकरच्या खेपामध्ये कोट्यावधी रुपयांचा गफला होवू शकतो, हे या प्रकरणावरून उघड झाले होते.

**पाथर्डी पंचायत समितीत २८ लाखांचा गोंधळ**

नगरसह पाथर्डी पंचायत समितीत या टँकर घोटाळ्यात २८ लाखांचा अपहार झाल्याचे तत्कालीन चौकशी समितीच्यावतीने सांगण्यात आले. मात्र, काळाच्या ओघात पाथर्डीच्या घोटाळ्याबाबत काय झाले याचा तपाशील मिळू शकला नाही. नगरचे प्रकरण केवळ पोलिसात गुन्हा दाखल झाल्याने जिवंत राहिले. पाथर्डीचे पुढे झाले हे सांगता येणे कठीण असल्याचे त्यावेळी तपास करणाऱ्या या घोटाळ्याच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

### गट-गणाच्या प्रभाग रचनेसाठी...

उपजिल्हाधिकारी महसूल, तहसीलदार सामन्य प्रशासन व संगणक तज्ज्ञ हे सदस्य असणार आहेत. त्याप्रमाणे तालुकास्तरावर जिल्हाधिकारी अध्यक्ष राहणार असून सदस्य म्हणून उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायक तहसीलदार (जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक काम पाहणारे), संगणक तज्ज्ञ असे पाच जण तालुकास्तरावर तर चार जण जिल्हास्तरीय समितीमध्ये राहणार आहे.

प्रारुप प्रभाग रचना राज्य शासनाच्या आदेशानुसार व योग्य ती दक्षता घेऊन तयार करण्याची जबाबदारी संबंधित समितीवर राहणार आहे. प्रारूप तयार करणे, तहसीलदारांनी तयार केलेला कच्चा आराखडा प्रभाग रचना समितीसमोर ठेवण्यात येईल, ही समिती हा अधिनियमातील तरतूदी, नियमातील तरतूदी व या आदेशातील तरतूदींचे पालन करून तयार केला आहे हे तपासले. ही समिती प्रारूप प्रभागर रचनेचे नकाशे योग्य रितीने तयारद करून तपासून पाहिले. अन्यथा योग्य नकाशे तयार करून घेण्याची कार्यवाही करेल, प्रभाग रचना पूर्वतयारीची संपूर्ण जबाबदारी ही जिल्हाधिकारी यांच्यावर राहणार आहे. त्यानुसार आता प्रभाग रचनेच्या कामाला सुरवात झाली आहे. प्रभाग रचनेच्या कामाला सुरवात झाल्याने राजकीय पक्षांनी देखील निवडणूक हालचालींना सुरवात केली असून गावानिहाय कार्यकर्ते व बुथ समितीच्या तयारी केली जात आहे.

### एका पोलीसाने आरोपीला...

(वय २८, रा. पाथर्डी) यांचे शिवनेरी मिसळ नावाचे हॉटेल पाथर्डी येथे आहे. हे हॉटेल रात्री १० नंतरही सुरू ठेवले जात असल्याने पोलीस अंमलदार लक्ष्मण पोटे याने हॉटेलवर कारवाई करण्याची धमकी देत तक्रारदाराकडून दरमहा दोन हजार रूपयांची लाच मागितली होती. या त्रासाला कंटाळून तक्रारदाराने १५ जून रोजी नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची खातरजमा करण्यात आल्यानंतर, पोटे याने दीड हजार रूपयांच्या तडजोडीवर लाच घेण्यास तयारी दर्शवली. त्यानुसार, १७ जून रोजी लाचलुचपत विभागाच्या पथकाने सापळा रचला. पोटे याने तक्रारदारास पाथर्डी येथील उपजिल्हा रूग्णालयात बोलावले व त्याच्यासमवेत असलेल्या पोलीस कोठडीतील संशयित आरोपी राहुल शिवाजी साबळे (वय २२, रा. शिक्षक कॉलनी, माळी बाळूळगाव, ता. पाथर्डी) याच्यामार्फत ही रक्कम स्वीकारण्यास सांगितले.

दरम्यान, राहुल साबळे याने तक्रारदाराकडून दीड हजार रूपये स्वीकारले व ती रक्कम पोलीस अंमलदार रामदास सोनवणे याच्याकडे सुपूर्त केली. मात्र, सोनवणे ही रक्कम घेऊन पळून गेला आणि पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. लाचलुचपत विभागाच्या कारवाईदरम्यान लक्ष्मण पोटे याला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्यासह रामदास सोनवणे आणि आरोपी राहुल साबळे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**भिंगारमध्ये खासगी व्यक्तीला पकडले**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या नाशिक पथकाने यशस्वी सापळा कारवाई करत बँकेच्या खासगी रिकव्हरी कर्मचाऱ्याला २० हजार रूपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले. जहीर अहमद इक्बाल मुलानी (वय ३० रा. एकनाथनगर, केडगाव) असे त्याचे नाव आहे. तक्रारदार यांना भिंगार मंडळ अधिकारी यांनी त्याच्या घराच्या जप्तीबाबत नोटीस बजावली होती. सदर नोटीसीची मुदत वाढवून देण्यासाठी मुलानी याने स्वतःला मंडळ अधिकारी यांचा प्रतिनिधी असल्याचे भासवत २० हजार रूपये लाचेची मागणी केली. तडजोडीनंतर लाच रक्कम २० हजार रूपये निश्चित झाली. मंगळवारी (१७ जून) दुपारी तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, ही रक्कम भिंगार परिसरात मुलानीकडे पंचासमक्ष दिली असता, लाचलुचपतच्या पथकाने मुलानीला रंगेहाथ पकडले. भिंगार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### घोडेगाव येथे ५ वाहनांसह...

घोडेगाव येथे छापा टाकला. फिरोज रशीद शेख याचे राहते घराजवळ गोवंश जातीचे जनावरे कत्तल करण्याचे उद्देशाने निर्दयतेने डांबून ठेवल्याचे व दोन ट्रकमध्ये गोवंश जिवंत जनावरे भरताना दिसून आले व एका टेम्पोमध्ये जनावरे भरलेले असताना मिळून आले. पथकाने घटना ठिकाणावरून निलेश रामकृष्ण शिंदे (वय ३५) रा. उंबरगाव, ता.श्रीरामपूर, शाहरूख शमशुद्दीन शेख (वय २५) रा. घोडेगाव, ता. नेवासा, व भारत भाऊसाहेब शहाराव (वय ३६) रा.फत्तेपूर ता. नेवासा या तिघांना ताब्यात घेतले.

सदरची जनावरे फिरोज रशीद शेख, रा. कृष्णानगर, घोडेगाव (फरार) व पापा कुरेशी (पूर्ण नाव माहित नाही) रा.आळेफाटा ता.जुन्नर जि.पुणे (फरार) यांचे मालकीची असून त्यांचे सांगणेवरून कत्तल करण्यासाठी घेऊन जाणार असल्याची माहिती सांगितली. ताब्यातील आरोपी मुद्देमालासह सोनई पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले. पथकाने पंचासमक्ष अशोक लेलंड कंपनीचा ट्रक (एमएच २३ एयू ५५२३), टाटा टेम्पो (एमएच १८ सीटी ४८७७), टाटा ट्रक (एमएच १६ एई ५४८४), मारुती सुझूकी वॅगनर कार (एमएच ०५ बीएस २८९८), मारुती सुझूकी अल्टो (ईयू १९३७) व ४२ गोवंशीय जनावरे असा १ कोटी २ लाख ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

पथकाने वर नमूद आरोपीविरूध्द सोनई पोलीस ठाण्यात गु.र.नं. २३०/२०२५ महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम कलम ५(अ), ५ (ब), ९ सह प्राण्यांना निदर्यतेने वागविणेचे कलम ३, ११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सोनई पोलीस ठाणे करत आहे.

### शिपाई पदांसाठी १ ते ८ जुलै...

कडून पाठविण्यात येणार आहेत. या परीक्षेकरीता विभागाकडून कोणत्याही इतर एजन्सीची वा मध्यस्थाची नेमणूक करण्यात आलेली नाही. जर याबाबत कोणती व्यक्ती, संस्था, मध्यस्थ अथवा इतरांकडून तशी बतावणी करण्यात येत असल्यास अशा व्यक्ती वा संस्थेपासून उमेदवारांनी सावध राहावे, असे आवाहन नोंदणी व मुद्रांक विभागातर्फे करण्यात आले आहे.

### बंदिवानांच्या मानधनात दुप्पट वाढ

करण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार आणीबाणीच्या काळात एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्यांना दरमहा २० हजार रूपये आणि त्यांच्या पश्चात पत्नीस किंवा पतीस दरमहा १० हजार रूपये मानधन देण्यात येईल.

एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकांना दरमहा १० हजार रूपये तर त्यांच्या पश्चात पत्नीस किंवा पतीस ५ हजार रूपये मानधन देण्यात येईल. हयात असलेल्या जोडीदारास मानधनासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेली व्यक्ती २ जानेवारी २०१८ पूर्वी हयात नसल्यास त्याच्या पश्चात त्याच्या जोडीदारास शपथपत्र जोडून अर्ज करता येणार आहे. यासाठीची मुदत याबाबतचा शासन निर्णय जाहीर झाल्यापासून ९० दिवसांचा राहणार आहे. या योजनेंतर्गत अर्ज करण्यासाठी यापूर्वी अटकेच्या वेळी किमान वय १८ वर्ष असणे आवश्यक होते, ही अट रद्द करण्यात आली आहे.